# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
# विद्यार्थी विकास विभाग

## संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना विनियमावली

**१) योजनेचे नांव** -

या विनियमांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ "संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना" या नावाने संबोधले जाईल.

**२) योजनेची अंमलबजावणी** -

सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या तारखेपासून अंमलात येतील.

**३) व्याख्या** - या विनियमांमधील उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे राहतील.

**विद्यार्थीनी** : विद्यार्थीनी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी पदविका व पद्व्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेली विद्यार्थीनी.

**४) उद्दिष्टये** - या योजनेची उद्दिष्टये खालीलप्रमाणे राहतील.

अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजु व होतकरु विद्यार्थीनींना उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक हातभार म्हणून बस पास सवलत योजना.

ब) विद्यार्थीनीचा कल उच्च शिक्षणाकडे वाढविणे.

क) उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम ठेवणे.

**५) पात्रता** -

अ) सदर योजनेचा लाभ हा दारीद्र्य रेषेखालील गटातील प्रत्येक महाविद्यालयातून चार विद्यार्थीनींना देण्यात येईल.

ब) सदर लाभधारक विद्यार्थीनी ही महाविद्यालयात नियमित ७५% पेक्षा जास्त उपस्थित असावी.

क) लाभधारक विद्यार्थीनी ही पात्रता परिक्षेत प्रथम प्रयत्नात ५० पेक्षा अधिक गुणांनी पास असावी.

ड) सदर योजनेचा लाभ हा बिगरव्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थीनीला लागू राहील.

**६) अर्जाचा नमुना व सादर करावयाची तिथी** -

सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थीनींना परिशिष्ट **'अ'** नुसार अर्ज संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांव प्रतिवर्षी दिनांक ३१ ऑगस्ट, पुर्वी सादर करणे अनिवार्य राहील. उपरोक्त नमूद तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये कुलगुरूंचे अनुमतीने अर्ज बोलाविणे अथवा स्विकारणे याचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना राहतील.

**७) निवड** -

सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य गरजु विद्यार्थीनीचे अर्ज परिशिष्ट **'अ'** मध्ये भरुन दि. ३१ ऑगस्ट पर्यंत छाणनी करुन लाभार्थी विद्यार्थीनीचे नांव संचालक, विद्यार्थी विकास ह्यांचेकडे पाठवतील व तसेच वर्षभरासाठी शैक्षणिक दिवसांकरीता लागणाऱ्या पासचे भाडे अंकेक्षित करुन १ सप्टेंबर पर्यंत पाठवतील.

**८) रिक्त जागा** -

संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/विद्यापीठ विभागप्रमुखांनी किमान चार विद्यार्थीनींचे नांवे लाभार्थी म्हणून व एका विद्यार्थीनीचे नांव प्रतिक्षार्थी म्हणून संचालक, विद्यार्थी विकास ह्यांचेकडे पाठविणे अनिवार्य आहे. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थीनी मधून कोणत्याही विद्यार्थीनीने कोणत्याही कारणास्तव योजनेचा लाभ नाकारल्यास किंवा तीला तो नियमात बसत नसल्याने अथवा विद्यापीठाने नाकारल्यास प्रतिक्षार्थी विद्यार्थीनी ही ह्या योजनेची लाभार्थी असेल.

**९) लाभ** -

सदर योजनेचा लाभ हा लाभार्थी विद्यार्थीनीला तीचे प्रवेशित दिनांकापासून लागु करण्यात येईल. जर त्या विद्यार्थीनीचा प्रवेश हा महिन्याचे २० तारखे नंतर असल्यास लाभार्थीला पुढील महिन्याचे १ तारखेपासुन देय राहील.

**१०) पालकाचे संमतीपत्र** -

सदर योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थीनीस परिशिष्ट **'ब'** मधील संमतीपत्र भरणे अनिवार्य आहे व ते अर्जासोबत जोडावे.

**११) अधिकार** -

सदर योजना राबवितांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मा.कुलगुरू हे अधिकारीत असतील. नियमावलीत फेरबदल करण्याचा अधिकार हा मा.कुलगुरूंचा राहील.

**१२) अर्थसहाय्य** -

सदर योजनेअंतर्गत लाभार्थी विद्यार्थीनींना त्यांचे बस भाडेकरीता (पास) लागणारे अर्थसहाय्य हे १००% विद्यापीठ फंडामधुन करण्यात येईल. सदर राशीचे विद्यापीठाचे अंकेक्षण झाल्यानंतर ही राशी ३१ मार्च पर्यंत विद्यापीठाकडून विद्यार्थीनीच्या बँक खाते मध्ये जमा करण्यात येईल.

बस पास सवलत ही योजना विद्यार्थीनींना परिक्षेच्या कालावधीत सुध्दा लागू राहील. १ एप्रिल ते ३० जुन हा कालावधी परिक्षेचा असल्यास याबाबतचे शोधन हे पुढील सत्रामध्ये विद्यार्थीनीच्या अधिकोष खात्यात जमा करण्यात येईल. याबाबतची देयके संचालक, विद्यार्थी विकास यांचे कार्यालयास १५ जुलै पर्यंत पाठविणे आवश्यक राहील. यानंतर प्राप्त होणाऱ्या देयकांचे शोधन कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही.

**(डॉ. राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ